Exh-'G' 85

प्रमाणित प्रत

# जिल्हाधिकारी कार्यालय, जालना

(नगर परिषद प्रशासन शाखा)
प्रशासकीय इमारत स.नं. ४८८ रिंग रोड, जालना
दूरध्वनी: ०२४८२/२२५१२१,२२५५०२,२२४४०० फॅक्स क्र: ०२४८२/२२५३२६/२२४४००

जा.क्र.२०२२/नपप्र/कार्या-१/कावि - 526 दि: 20/06/2023

प्रति,

उपसचिव,
नगर विकास विभाग-17
मंत्रालय, मुंबई

**विषय:** जालना जिल्हयातील जालना नगर परिषदेचे महानगरपालिकेमध्ये रुपांतर करणे कामी प्रसिध्द करणेत आलेल्या प्रारुप अधिसूचनेबाबत प्राप्त हरकती व सुचनांचा गोषवारा सादर करणे बाबत.

**संदर्भ:** 1. शासन राजपत्रात दि 09/05/2023 रोजी प्रसिद्ध झालेली उद्घोषणा
2. आपले पत्र क्रमांक- एमयूएम-2022/प्रक्र331/नवि-17 दि: 10/05/2023
3. या कार्यालयाची जाहीर सूचना जाक्र.2022/नपप्र/कार्या-1/कावि-386 दि: 10/05/2023
4. मुख्याधिकारी नप जालना यांचा अहवाल दि 09/06/2023 व
5. मुख्याधिकारी नप जालना यांचा अहवाल दि 16/06/2023

महोदय,

विषयांकीत प्रकरणी जालना जिल्हयातील जालना नगर परिषदेचे महानगरपालिकेमध्ये रुपांतर करणे बाबतची संदर्भ क्र 1 अन्वये उद्घोषणा शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली होती. तसेच नमूद उद्घोषणामध्ये दिनांक 08/06/2023 पुर्वी या मसुदयाबाबत जिल्हाधिकारी जालना यांचेकडे कोणत्याही व्यक्तींकडून प्राप्त होणा-या सुचना आणि हरकतीवर शासनाकडून विचार करण्यात येईल, अशा सुचना देण्यात आल्या होत्या.

त्यामुळे सदर उद्घोषणा बाबत या कार्यालयाने संदर्भ क्र 03 अनुसार जाहीर सूचना विविध कार्यालयात प्रसिद्ध केली होती आणि त्यास दैनिक लोकमत व दैनिक आनंद नागरी द्वारे व्यापक प्रसिद्धी देण्यात आली होती. त्यानुसार या कार्यालयास दि 08 जून 2023 रोजी पर्यंत पुढील तकत्यात दर्शविल्या प्रमाणे हरकती व सूचना प्राप्त झाले आहेत.

| अ.क्र. | सुचना/हरकत दारांचे नांव व पत्ता | सुचना / हरकती प्राप्त झाल्याचे दिनांक |
|---|---|---|
| 1 | ॲड श्री महेश सिताराम धन्नावत | 11/05/2023 |
| 2 | श्री रमेश देहेडकर व इतर 05 | 12/05/2023 |
| 3 | श्री विजयकुमार हरिश्चंद्र आर्यमानव रा जालना | 13/05/2023 |
| 4 | श्री रविकांत जगधने रा जालना | 29/05/2023 |
| 5 | श्री संतोष सखाराम गाढे रा जालना | 05/06/2023 |
| 6 | श्री साईनाथ रामस्वामी चिन्नादोरे व इतर 46 रा जालना | 05/06/2023 |
| 7 | श्री साईनाथ रामस्वामी चिन्नादोरे व इतर 04 रा जालना | 05/06/2023 |
| 8 | श्री सुनील ए जोशी अध्यक्ष रामनगर कॉलनी सहकारी गृहनिर्माण संस्था जालना | 07/06/2023 |

सदर प्राप्त हरकती व सूचना यावर मुख्याधिकारी यांचा संदर्भ क्र 05 अन्वये अहवाल घेण्यात आला असून या कार्यालयाचे अभिप्रायासह गोषवारा आणि हरकती व सुचनांच्या छायांकित प्रती यासोबत सादर करण्यात येत आहे. तरी अवलोकन होवून पुढील कार्यवाही होणेस विनंती आहे.

सोबत - १.हरकती व सुचना गोषवारा (पृष्ठ क्र .. ते .. )
२.हरकती व सुचनांचा छायाप्रती (पृष्ठ क्र .. ते ..)

(डॉ विजय राठोड)
जिल्हाधिकारी, जालना.

**जालना नगर परिषदेचे महानगरपालिकेमध्ये रुपांतर करणेकामी प्रसिध्द करणेत आलेल्या प्रारुप अधिसुचनेबाबत प्राप्त हरकती व सुचनांचा गोषवारा.**

| अ. क्रं. | सुचना / हरकत दारांचे नांव व पत्ता | सुचना/हरकती प्राप्त झाल्याचे दिनांक | सुचना/हरकतीचा तपशिल (थोडक्यात) | सुचना व हरकती बाबत जिल्हाधिकारी कार्यालयाचे अभिप्राय | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 1 | ॲड. महेश सिताराम धन्नावत रा जालना | 11/05/2023 | 1. जालना शहरात अनेक झोपडपटटी वासियांना पी आर कार्ड देण्याबाबत शासंन विचाराधीन होते ते सर्व लोकांना महानगर पालिका निर्माण होण्यापुर्वी पी आर कार्ड देऊन टाकावे.<br>2. जालना शहरात अनेक वेशी जी रहदारी च्या रस्त्यावर आहे नगर पालिका यांनी केलेल्या स्ट्रकचरल ऑडीट प्रमाणे धोकादायक आहे त्या बाबत त्वरीत निर्णय घेऊन लोकांना सुरक्षित वातावरण प्रदान करावे.<br>3. जालना शहरात असलेल्या उघडया गटारीवर धापे त्वरीत बसवावे अनेक विभागात व प्रभागात न अंडरग्राऊड ड्रेनेज तयार केलेले आहे मात्र चेबर वर ढापे टाकण्यात आलेले नाही त्यामुळे त्यावर ढापे त्वरीत टाकण्यात यावे.<br>4. शहरातील अतिक्रमण्य त्वरीत काढण्यात यावे.<br>5. लोकांना सार्वजनिक शौचालय उपलबध करुन द्यावे तथा सध्या शहरात अनेक पेट्रोलपंप व कॉम्पलेक्स असून तिथे सुध्दा शौचालय ची व्यवस्था असणे गरजेचे आहे सार्वजनिक वापरासाठी खुले असावे यासाठी स्वच्छता /हायजीन ऑडीट करण्यात यावे.<br>6. जालना शहरात सध्या कोणतीही सुविध उपलब्ध नाही रोड बरोबर नाही नाल्या तुंबलेल्या आहेत व डेंगु ची साथ त्यामुळे अशा परिस्थितीत महानगरपालिका करण्यापुर्वी सर्व प्रकारचे करा मध्ये सुट द्यावी व महानगरपालिका झाली तर कोणत्याही प्रकारे नवीन कर किंवा जुन्या करा मध्ये वाढ होणार नाही.<br>7. नगर परिषदेचे कर्मचारी व अभियंता यांचे सुध्दा बदली करण्यात यावी नवीन वर्ग चांगल्या रित्या काम करु शकतील व लोकांना सुविधा मिळतील. | अर्जदाराने नागरी समस्या, सुविधा व मागण्या संबंधी मुद्दे उपस्थित केले आहेत. नगर परिषद व महानगरपालिका या दोन्ही स्थानिक स्वराज्य संस्थेचे कामाचे स्वरुप सारखेच असल्यामुळे सदर नागरी समस्या, सुविधा व मागण्या यावर कार्यवाही महानगरपालिका प्रशासन याव्दारे पण करता येणार आहे. त्यामुळे अर्ज फेटाळणे योग्य राहील. | |
| 2 | श्री रमेश देहेडकर व इतर 05 रा जालना | 12/05/2023 | 1. वरील संदर्भानुसार जालना महानगर पालिका होण्याची सूचना काढण्यात आली आहे. परंतु जालना नगरपालिका जनतेला मूलभूत सुविधा देण्यास असमर्थ ठरलेली असताना महानगर पालिकेत रुपांतर करणे म्हणजे | अर्जदाराने नागरी समस्या, सुविधा व मागण्या संबंधी मुद्दे उपस्थित केले आहेत. नगर | |